**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


पत्र क्रमांक रातुमनावि/विद्या/१८/८७७

दिनांक ०२ नोव्हेंबर,२०१८

# : शुध्दीपत्रक :

अधिसूचना क्रमांक रातुमनावी/ विद्या/१८/७३५ दिनांक ३० जुलै,२०१८ नुसार विशेष कार्य समित्यापैकी (Special Task Committies) एकुण ५४ विशेष कार्य समित्या मा. कुलगुरू महोदयांनी दिनांक ३० जुलै,२०१८ रोजी बरखास्त केल्या आहेत. परंतु गणित अभ्यासमंडळाकरिता गठित विशेष कार्य समिती ही कायम होती. कारण या अभ्यासमंडळाच्या अध्यक्षाबाबत निवडणुकीची बाब न्यायप्रविष्ट आहे.

परंतु गणित अभ्यासमंडळाच्या सदस्याकरिता निवडणुक संपन्न झालेली आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कायदयातील तरतुदीनुसार मा.कुलगुरू महोदयांनी नामनिर्देशन केलेले असून नामित सदस्यांची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

करिता अधिसूचना क्रमांक रातुमनावि/विद्या/१५/५१३ दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ नुसार गठीत व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शुध्दीपत्रकाद्वारे गणित अभ्यासमंडळाकरिता गठित विशेष कार्य समिती आज दिनांक ०२ नोव्हेंबर,२०१८ रोजी मा.कुलगुरू महोदयांनी बरखास्त केलेली आहे. त्यामुळे या समितीवर समन्वयक व अनुक्रमांक २ व ३ वर दर्शविलेल्या सदस्यांना प्राश्निक, परीक्षक व नियामक नामित केले होते त्यांचेही पद आपोआप संपुष्टात आलेले आहे. याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच नवनियुक्त गणित अभ्यासमंडळाचे सदस्य महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४०(२)(ग) व ४०(२)(ख)(१)(२)(३) नुसार निवडणुक व नामनिर्देशनद्वारे अभ्यासमंडळावर आले आहेत. त्यामुळे सदर सदस्य या पुढे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधिल तरतुदी नुसार कार्य करतील.

मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार

(डॉ.निरज खटी)
कुलसचिव (अतिरिक्त प्रभार)

प्रतिलिपी माहितीकरीता :–

१. मा. कुलगुरू,
२. मा. प्र– कुलगुरू,
३. मा. कुलसचिव,
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ
५. मा. वित्त व लेखाअधिकारी,
६. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे मा. अधिष्ठाता,
७. गणित विशेष कार्य समित्यांचे मा. समन्वयक व सदस्य,
८. विद्यापीठाचे सर्व अधिकारी,
९. डॉ.(श्रीमती) विना प्रकाशे, माहितीशास्त्रज्ञ

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

(डॉ.अनिल हिरेखन)
उपकुलसचिव (विद्या)